मुंबई सकाळ TODAY
शुक्रवार, १६ मे २०१४

# तरुणांना उद्योग सुरू करण्यास विनासायास पतपुरवठा व्हावा

## नव्या सरकारकडून एसएमई चेंबरची अपेक्षा

वैभव वझे : सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. १५ : औद्योगिक क्षेत्रात लघू व मध्यम उद्योगांचे (एसएमई) महत्त्व सर्वांनाच पटले आहे. या एसएमई क्षेत्रात अनेक तरुण उद्योजक बनू इच्छित आहेत; परंतु हाती पैसा नसल्यामुळे त्यांना उद्योजक होता येत नाही, म्हणूनच तरुणांना उद्योग सुरू करण्यासाठी विनासायास पतपुरवठा होणे गरजेचे आहे, असे मत एसएमई चेंबर ऑफ इंडियाचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी 'सकाळ'कडे व्यक्त केले. नव्या सरकारकडून असलेल्या अपेक्षा सांगताना ते बोलत होते.

उदयोन्मुख उद्योजकांना पैशाअभावी उद्योग सुरू करता येत नाही, अशी



खंत साळुंखे यांनी व्यक्त केली. मलेशिया, थायलंड, व्हिएतनाम या देशांत केवळ अडीच टक्के दराने नव्या उद्योगासाठी पतपुरवठा केला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लघू उद्योग निर्माण होऊन रोजगारनिर्मितीही होते; परंतु आपल्या देशात असे होत नाही. त्याचप्रमाणे २५ कोटी रुपयांची उलाढाल असणाऱ्या लघू उद्योगाला उत्पादन शुल्क आणि सेवा कर यांतून सोडवणे गरजेचे आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

राज्याची राजधानी असलेले मुंबई हे शहर आर्थिक केंद्र बनावे यासाठी सेबी, रिझर्व्ह बँक यांनी एक आराखडा तयार केला होता. त्याची जलद गतीने अंमलबजावणी करावी लागेल. सध्या सर्व एसएमई उद्योगांना कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. सरकारने मोठा गाजावाजा करत राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची स्थापना केली आहे; परंतु या माध्यमातून एखादा अकुशल कर्मचारी तंत्रकुशल झाल्यावर त्याची नोंदणी कुशल कर्मचारी म्हणून झाली, तरच अनेक उद्योजकांना त्याचा फायदा उठवता येईल; शिवाय माणसे घेताना निश्चित माहिती हाताशी राहील, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. स्थिर सरकार आणि प्रगतीचा दृष्टिकोन असणारे मंत्री याची अर्थव्यवस्थेला तातडीने गरज आहे, असेही चंद्रकांत साळुंखे म्हणाले.